नोंदणी क्रं. RNI. MAHMAR/2023/84162
Registration No. MAHMAR/2023/84162

दैनिक

# यश सिद्धि न्यूज

संपादक : कमलाकर सोनकांबळे

YASH SIDDHI NEWS

वर्ष - ३ रे Year - 3rd | अंक - २८८ Issue - 288 | वार मंगळवार दि. १० मार्च २०२६ Blow- Tuesday Date 10 March 2026 | ई-पेपर - https://epaper. yashsiddhinews.com वेब पोर्टल - www.yashsiddhinews.com | पाने - ४ Pages - 4 | किंमत - ४.०० रुपये Amount - 4 /- Rs | पोस्टल परवाना : SLP/298/2024-2026 ई-मेल आयडी yashsiddhinews@ gmail.com

# इराण युद्धावरून दोन्ही सभागृहात गोंधळ

## विरोधकांकडून चर्चेची मागणी; केंद्र सरकार म्हणाले, लोकसभा सभापतींना हटवण्याच्या प्रस्तावावर चर्चा करण्यास तयार

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

नवी दिल्ली : संसदेच्या अर्थसंकल्पीय अधिवेशनाच्या दुसऱ्या टप्प्याच्या आज (९ मार्च) पहिल्या दिवशी लोकसभा आणि राज्यसभेत अमेरिका-इस्रायल आणि इराण युद्धावरून मोठा गोंधळ झाला. विरोधकांनी पश्चिम आशियातील युद्धोत्तर परिस्थितीवर चर्चा करण्याची मागणी केली. दरम्यान, परराष्ट्रमंत्र्यांनी प्रथम राज्यसभेत आणि नंतर लोकसभेत आखाती देशांमधून भारतीयांच्या परतीच्या तयारी आणि ऊर्जा संकटाबद्दल भाषण केले.

राज्यसभेत विरोधकांनी सभात्याग केला. जयशंकर म्हणाले, सध्या इराणी नेतृत्वाशी संपर्क साधणे कठीण आहे, परंतु भारत शांतता आणि संवादाच्या बाजूने आहे. लोकसभेत विरोधकांनी परराष्ट्रमंत्र्यांना बोलण्यापासून रोखले. त्यांच्या भाषणादरम्यान त्यांनी गोंधळ घातला, खासदारांनी आम्हाला चर्चा हवी आहे असे घोषणा दिल्या. दरम्यान, लोकसभा अध्यक्ष ओम बिर्ला यांना हटवण्याच्या मागणीच्या विरोधी पक्षाच्या प्रस्तावावरील चर्चे दरम्यान गोंधळ उडाला. केंद्रीय मंत्री किरेन रिजिजू म्हणाले, आम्ही चर्चे साठी तयार आहोत. तुम्ही चर्चा करावी.

६७ हजार नागरिकांनी आंतरराष्ट्रीय सीमा ओलांडली



दरम्यान, परराष्ट्र मंत्री एस. जयशंकर निवेदन देताना म्हणाले, सध्याचा संघर्ष भारतासाठीही चिंतेचा विषय आहे. आपण शेजारी आह-ोत आणि पश्चिम आशियात स्थिरता राखणे ही आपली जबाबदारी आहे. दहा लाख भारतीय आखाती देशांमध्ये राहतात आणि काम करतात. काही हजार भारतीय शिक्षणासाठी किंवा नोकरीसाठी इराणमध्ये आहेत. हा प्रदेश आपल्या ऊर्जा सुरक्षेसाठी म हत्त्वाचा आहे आणि त्यात तेल आणि वायूचे अनेक आवश्यक पुरवठादार आहेत. पुरवठा साखळीतील व्यत्यय आणि अस्थिरता ही गंभीर समस्या आहेत.

आपण दोन भारतीय खलाशी (व्यापारी शिपिंग) गमावले आहेत आणि एक अजूनही बेपत्ता आहे. १४ जानेवारी रोजी, मुंबईतील शिपिंग महासंचालनालयाने भारतीय खलाशांना दूतावासाच्या सल्ल्याचे पालन करण्याचा आणि किनाऱ्यावर अनावश्यक प्रवास टाळण्याचा सल्ला दिला.

पश्चिम आशियातील आपल्या लोकांना परत आणण्यासाठी सर्वतोपरी प्रयत्न केले जात आ-हेत. ८ मार्चपर्यंत, आपल्या सुमारे ६७ हजार नागरिकांनी आंतरराष्ट्रीय सीमा ओलांडली होती. संबंधित मंत्रालये प्रतिसाद देण्यासाठी सम न्वय साधत आहेत. युद्ध वाढतच आहे. या प्रदेशातील सुरक्षा परिस्थिती लक्षणीयरीत्या बिघडली आहे. खरं तर, लढाई इतर देशांमध्ये पसरली आहे, ज्यामुळे विनाश आणि मृत्यूंम ध्ये वाढ झाली आहे.

इस्रायल, अमेरिका आणि इराणम ध्ये लढाई सुरू आहे आणि काही आखाती देशांवरही हल्ले झाले आहेत. इराणी नेतृत्व पातळीवरील अनेक लोक मारले गेले आहेत आणि या प्रदेशातील पायाभूत सुविधा उद्ध्वस्त झाल्या आहेत. नेतृत्व पातळीवर इराणशी संपर्क साधणे स्पष्टपणे कठीण आहे. इराणी युद्धनौका लावनला कोची बंदरात उतरवण्याची परवानगी दिल्याबद्दल इराणच्या परराष्ट्रमंत्र्यांनी भारताचे आभार मानले.

भारताच्या परराष्ट्र धोरणावर चर्चा आवश्यक

समाजवादी पक्षाचे खासदार अखिलेश यादव म्हणाले, आम्ही कोणाकडून तेल खरेदी करावे हे अमेरिका ठरवत आहे. भारताच्या परराष्ट्र धोरणावर संसदेत चर्चा झाली पाहिजे.

काँग्रेस खासदार डॉ. सय्यद नसीर हुसेन म्हणाले, आम्हाला पश्चिम आशियातील संकट आणि त्यामुळे निर्माण झालेल्या ऊर्जा संकटावर थोडक्यात चर्चा हवी होती. असे दिसते की अमेरिकेचे अध्यक्ष आम चे बॉस बनले आहेत, ते आम्ह-ाला कोणाकडून तेल खरेदी करायचे हे सांगत आहेत. ही परिस्थिती का उद्भवली आहे? आम्हाला भारताच्या परराष्ट्र धोरणावर चर्चा करायची आहे, ऊर्जा संकट रोखायचे आहे आणि भारतीयांचे संरक्षण करायचे आहे. निवेदन जारी करणे निरर्थक आहे, कारण आम्ही सरकारला कोणतेही प्रश्न विचारू शकत नाही. सरकार चर्चे पासून का दूर जात आहे?

---

### मंत्री प्रताप सरनाईक यांची माहिती

# राज्यात आजपासून रिक्षा परवाना देण्यास स्थगिती

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

मुंबई : राज्याचे परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांनी मोठा निर्णय घेतला आहे. राज्यात रिक्षा परवाना देण्यास आजपासून स्थगित करण्यात आले आहे. याबाबत आता मंत्रिमंडळ बैठकीत चर्चा होणार आहे. या बैठकीत योग्य ती नियमावली तयार करण्यात येणार आहे. या नव्या नियमावलीनुसार आता रिक्षाची परवाने दिली जाणार आहेत. स्वत: परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांनी याबाबत माहिती दिली आहे. राज्यात आता सर्रासपणे रिक्षा परवाने मिळणार नाहीत. केंद्रीय वाहतूक मंत्र्यांसोबत पत्रव्यवहार केल्यानंतर परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांनी हा निर्णय घेतला आहे. याबाबत मंत्रिमंडळात चर्चा केल्यानंतर योग्य नियमावली तयार करुन परवाने दिले जाणार आहेत. तोपर्यंत परवाने दिले जाणार नाहीत. मात्र तोपर्यंत परवाने दिले जाणार नाहीत, असं स्पष्ट करण्यात आलं आहे. प्रताप सरनाईक यांनी याबाबत महत्त्वाची प्रतिक्रिया दिली आहे.

अनेक वर्षांपासून राज्यात रिक्षाचे परवाने खुले केले गेले होते. पण अनेक संघटनांनी, रिक्षा असोसिएशनने मागणी केली होती की, रिक्षांची संख्या जास्त झाली आहे. त्यामुळे व्यवसायावर परिणाम होतो. त्याचबरोबर अनेक लोकप्रतिनिधींनी मागणी केली होती की, रिक्षांच्या जास्त संख्येमुळे वाहतूकीची मोठी समस्या निर्माण होते. पर्यावरणाचा ऱ्हास होतो म्हणून काही पर्यावरणादींनी देखील याबाबत मागणी केली होती. त्यामुळे मी सातत्याने केंद्र सरकारकडे पाठपुरावा करत होतो. पण केंद्र सरकारची परवानगी नसल्यामुळे आम्ही त्यावर बंदी घालू शकत नव्हतो, असं प्रताप सरनाईक म्हणाले.

मी स्वत: केंद्रीय वाहतूक मंत्र्यांना पत्र पाठवलं. त्या पत्राला त्यांचं उत्तर आलं. त्या उत्तराच्या अनुषंगाने त्यांनी आम्ह-



ाला निर्णय घेण्याचे अधिकार दिले. त्यामुळे आज आरटीओचे आणि संबंधित सगळ्या अधिकाऱ्यांची बैठक घेऊन हे जेवढे काही पर-वाने म्हणजे ११ लाख परवाने दिले गेले होते, आज म्हणजे ९ मार्च पासून दिले जाणारे सर्व परवान्यांना स्थगिती देण्यात आली आहे, अशी माहिती मंत्री प्रताप सरनाईक यांनी दिली.

भविष्यात हे परवाने गोर गरिबांना मिळा-वेत, राज्यामध्ये शेतकऱ्यांची पोरं आहेत. त्यांना उदरनिर्वाहची दुसरे साधने मिळावे. सुशिक्षित बरोजगार आहेत, त्यांना काहीतरी व्यवसायासाठी दुसरे साधन मिळावे या दृष्टीने काही उपाययोजना होत आहेत का, याचा आम्ही विचार करतोय. त्यामाध्यमातून डजझ तयार करतोय. त्या डजझ च्या आधारे आम्ही प्रस्ताव कॅबिनेटमध्ये सादर करणार आहोत. कॅबिनेटने बैठकीत जो निर्णय घेतला जाईल त्यानुसार पुढील कारवाई करणार आहोत, अशी देखील महत्त्वाची माहिती प्रताप सरनाईक यांनी दिली.

---

# कथित दिल्ली मद्य धोरण घोटाळा प्रकरणात हायकोर्टाची सर्व २३ आरोपींना नोटीस; सीबीआय तपास अधिकाऱ्याविरुद्ध विभागीय कारवाईलाही स्थगिती

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

नवी दिल्ली : दिल्ली उच्च न्यायालयाने माजी मुख्यमंत्री अरविंद केजरीवाल आणि माजी उपमुख्यमंत्री मनीष सिसोदिया यांच्यासह २३ आरोपींना नोटीस बजा-वून त्यांचे उत्तर मागितले. सीबीआय अधिकाऱ्यांविरुद्ध ट्रायल कोर्टाच्या टिप्पण्यांना उच्च न्यायालयाने स्थगिती दिली. न्यायमूर्ती स्वरण कांता शर्मा यांनी असेही निर्देश दिले की ट्रायल कोर्टाने संबंधित मनी लाँड्रिंग (पीएमएलए) प्रकरणातील पुढील सुनावणी उच्च न्यायालय या प्रकरणाची पुढील सुनावणी होईपर्यंत पुढे ढकलली पाहिजे. २७ फेब्रुवारी रोजी ट्रायल कोर्टाने या प्रकरणातील सर्व २३ आरोपींना निर्दो ष मुक्त केले. सीबीआयने या आदेशाला उच्च न्यायालयात आव्हान दिले आहे. ९७४ पानांच्या याचिकेत सीबीआयचा आरोप आहे की ट्रायल कोर्टाने आरोपपत्र सादरीकरणाच्या टप्प्यावरच मिनी ट्रायल केली. न्यायालयाने सर्व पुरावे तपशीलवार तपासण्यास सुरुवात केली, जणू काही संपूर्ण प्रकरण सुरू आहे, तर या टप्प्यावर, फक्त खटल्याचा सरसकट आढावा आवश्यक आहे.

तपास अधिकाऱ्याविरुद्ध विभागीय कारवाईलाही स्थगिती

सुनावणीदरम्यान, सॉलिसिटर जनरल तुषार मेहता यांनी सांगितले की, एजन्सी सध्या निर्दोष मुक्ततेच्या आद-ेशावर स्थगिती मागत नाही, परंतु ट्रायल कोर्टाच्या निर्णयाचा ईडीच्या मनी लाँडरिंग चौकशीवर परिणाम होणार नाही याची खात्री करू इच्छिते. उत्पादन शुल्क धोरण प्रकरणाची चौकशी करणाऱ्या सीबीआय अधिकाऱ्याविरुद्ध विभागीय कारवाई करण्याच्या ट्रायल कोर्टाच्या आदेशावर उच्च न्यायालयाने स्थगिती दिली आहे. २७ फेब्रुवारी रोजी, दिल्लीच्या राऊस अव्हेन्यू कोर्टाने दिल्लीचे माजी मुख्यमंत्री अरविंद केजरीवाल आणि माजी उपमुख्यमंत्री मनीष सिसोदिया यांच्यासह या प्रकरणात आरोपी असलेल्या २३ जणांना निर्दोष मुक्त केले.

सीबीआयने उच्च न्यायालयात निर्णयाविरुद्ध अपील केले

**मनी लाँड्रिंग प्रकरणात सुनावणी न करण्याचे आदेश**

निकालानंतर अवघ्या सहा तासांत, सीबीआयने उच्च न्यायालयात निर्णयाविरुद्ध अपील केले. कनिष्ठ न्यायालयाच्या आदेशाला आव्हान देत, सीबीआयने उच्च न्यायालयाच्या निर्णयाला रद्द करण्याची मागणी केली आहे. दरम्यान, निर्दो ष मुक्ततेनंतर न्यायालयाबाहेर माध्यमांशी बोलताना केजरीवाल भावुक झाले होते. ते म्हणाले, मी माझ्या आयुष्यात फक्त प्रामाणिकपणा मिळवला आहे. आज हे सिद्ध झाले आहे की केजरीवाल, मनीष सिसोदिया आणि आम आदमी पक्ष हे कट्टर प्रामाणिक आहेत.

---

# मनपा-नगरपालिका क्षेत्रातील हजारो हेक्टरवरील गायरान जमिनीवरील आरक्षण उठवले, कोट्यवधींची जमीन सार्वजनिक वापरासाठी मोकळी

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

मुंबई : महाराष्ट्र विधानसभेत जमीन महसूल संहिता (सुधारणा) विधेयक मंजूर करण्यात आलं आहे. त्यामुळे आता म हापालिका आणि नगरपालिका क्षेत्रातील हजारो हेक्टर गायरान जमीन सार्वजनिक कामांसाठी वापरण्याचा मार्ग मोकळा झाला आहे. महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी मांडलेले महाराष्ट्र जमीन महसूल संहिता (सुधारणा) विधेयक विधानसभेत एकमताने मंजूर करण्यात आले.

महाराष्ट्र विधानसभेत जमीन वापरासंदर्भात महत्त्वाचा निर्णय घेण्यात आला आहे. या विधेयकामुळे महापालिका आणि नगरपालिका हद्दीतील गायरान जमि नींच्या वापराबाबत मोठा बदल होणार आहे. हजारो हेक्टर गायरान जमीन सार्वजनिक जनहिताच्या कामांसाठी वापरण्याचा मार्ग आता मोकळा होणार आहे.

नव्या निर्णयानुसार राज्यातील मनपा आणि नगरपालिका क्षेत्रातील गायरान जमिनीवरील काही आरक्षण उठवण्यात येणार आहे. यामध्ये महापालिका क्षेत्रातील सुमारे ७७०० हेक्टर जमीन, नगरपालिका क्षेत्रातील सुमारे ४००० हेक्टर जमीन, नगर परिषद क्षेत्रातील सुमारे ३००० हेक्टर जमीन अशी एकूण हजारो हेक्टर जमीन सार्वजनिक कामांसाठी उपलब्ध होणार आहे.

जमीन शासनाच्या नावावर

या जमिनी शासनाच्या नावावरच राहतील. मात्र शासनाच्या परवानगीने महापालिका किंवा नगरपालिका या जमि नींचा वापर सार्वजनिक हिताच्या कामांसाठी करू शकतील. महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी सांगितले की, या निर्णयाम ुळे महापालिका आणि नगरपालिका यांना विकासकामांसाठी मोठा फायदा होणार आहे. व्यावसायिक वापराला परवानगी नाही या गायरान जमिनींचा वापर फक्त सार्वजनिक हिताच्या कामांसाठीच करता येणार आहे. व्यावसायिक वापरासाठी या जमिनींचा उपयोग करता येणार नाही, असेही सरकारने स्पष्ट केले आहे.

**जिल्हाधिकाऱ्यांची परवानगी आवश्यक** – नव्या नियमानुसार गायरान जमीन ही जिल्हाधिकारी जमिनी म्हणून नोंदवली जाईल. या जमिनींचा कोणताही वापर करण्यासाठी जिल्हाधिकाऱ्यांची पर-वानगी घेणे बंधनकारक असेल. तसेच जमिनीची मोजणी करून तिची नोंद केली जाईल आणि अतिक्रमण हटवून ती शासनाच्या ताब्यात घेतली जाईल. या निर्णयामुळे राज्यातील २९ महापालिका आणि अनेक नगरपालिका क्षेत्रांतील गायरान जमीन विकासकामांसाठी उपलब्ध होण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.

---

### गृहमंत्रालयासोबत समन्वय साधून कठोर कारवाईचे मंत्री आदिती तटकरे यांचे संकेत

# सोशल मीडियावर महिलांविषयी आक्षेपार्ह टिप्पणी करणे भोवणार

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

मुंबई : सोशल मीडियाच्या माध्यम ातून सामान्य महिलांपासून ते महिला अधिकाऱ्यांपर्यंत सर्वांनाच खालच्या पातळीवर जाऊन लक्ष्य केले जात आहे. अशा प्रवृत्तींमुळे महिलांच्या मन:स्वास्थ्यावर गंभीर परिणाम होत असून, हे प्रकार रोखण्यासाठी राज्य सरकार आता कठोर पावले उच-लणार आहे. सायबर गुन्हेगारी आणि महिलांविरोधी टिप्पणी रोखण्यासाठी गृहविभागासोबत विशेष समन्वय साधला जाईल, अशी घोषणा महिला व बालविकास मंत्री आदिती तटकरे यांनी सोमवारी विधानसभेत केली.

जागतिक महिला दिनाचे औचित्य साधून विधानसभा अध्यक्ष राहुल नार्वेकर यांनी मांडलेल्या प्रस्तावावर झालेल्या चर्चेला तटकरे उत्तर देत होत्या. यावेळी त्यांनी महिलांच्या सक्षमीकरणासाठी आणि सुरक्षेसाठी विविध महत्त्वपूर्ण योजनांची घोषणा केली. महिला बचत गटांनी उत्पादित केलेल्या वस्तूंना हक्काची बाजारपेठ मिळावी यासाठी राज्यात 'उमेद मॉल' ही संकल्पना राबवण्यात येणार आहे. पहिल्या टप्प्यात प्रायोगिक तत्त्वावर १३ जिल्ह्यांमध्ये हे मॉल उभारले जा-तील. तालुक्याच्या प्रमुख बाजारपेठांम ध्ये बचत गटांच्या वस्तू आणि खा-द्यपदार्थ उपलब्ध करून दिले जातील, असे तटकरे यांनी सांगितले.

याशिवाय, मोबाईल पच्या माध्यमातून केल्या जाणाऱ्या बेकायदेशीर लिंगनिदानाबाबत त्यांनी चिंता व्यक्त केली. अशा प्रकारांवर अंकुश ठेवण्यासाठी गृह आणि सार्वजनिक आरोग्य विभागाची संयुक्त समिती गठित करून कठोर कार्यवाही करण्याचे आश्वासन त्यांनी सभागृहाला दिले. तटकरे म्हणाल्या, केंद्र आणि राज्य सरकारच्या महिलांविषयक सर्व योजना एकाच प्लॅटफॉर्मवर आणण्यासाठी विभाग काम करत आहे. नोकरी करणाऱ्या महिलांसाठी केंद्र सरकारच्या मदतीने वसतिगृहांची संख्या वाढवण्यात येईल. महिला लोकप्रतिनिधींचे प्रशासकीय कौशल्य आणि योगदान वाढवण्यासाठी 'यशदा'च्या माध्यमातून विशेष प्रशिक्षण वर्ग आयोजित केले जातील, असेही त्यांनी सांगितले.

लाडक्या बहिणी आल्या मुख्य आर्थिक प्रवाहात

'मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण' योजनेच्या यशाचा उल्लेख करताना आदिती तटकरे म्हणाल्या की, या योजनेमुळे राज्यातील महिला खऱ्या अर्थाने मुख्य आर्थिक प्रवाहात आल्या आहेत. योजनेचे पैसे थेट खात्यात जमा करण्याच्या अटीमुळे आजवर बँक खाते नसलेल्या तब्बल ५० लाख महिलांनी बँकांमध्ये स्वतः चे खाते उघडले आहे, ही मोठी उप-लब्धी आहे.



दैनिक
यश सिद्धि न्यूज



## संपादकीय....

### युद्धावरून गोंधळ

संसदेच्या अर्थसंकल्पीय अधिवेशनाच्या दुसऱ्या टप्प्याच्या पहिल्या दिवशी लोकसभा आणि राज्यसभेत अमेरिका-इस्रायल आणि इराण युद्धावरून मोठा गोंधळ झाला. विरोधकांनी पश्चिम आशियातील युद्धोत्तर परिस्थितीवर चर्चा करण्याची मागणी केली. दरम्यान, परराष्ट्रमंत्र्यांनी प्रथम राज्यसभेत आणि नंतर लोकसभेत आखाती देशांमधून भारतीयांच्या परतीच्या तयारी आणि ऊर्जा संकटाबद्दल भाषण केले. राज्यसभेत विरोधकांनी सभात्याग केला. जयशंकर म्हणाले, सध्या इराणी नेतृत्वाशी संपर्क साधणे कठीण आहे, परंतु भारत शांतता आणि संवादाच्या बाजूने आहे. लोकसभेत विरोधकांनी परराष्ट्रमंत्र्यांना बोलण्यापासून रोखले. त्यांच्या भाषणादरम्यान त्यांनी गोंधळ घातला, खासदारांनी आम्हाला चर्चा हवी आहे असे घोषणा दिल्या. दरम्यान, लोकसभा अध्यक्ष ओम बिर्ला यांना हटवण्याच्या मागणीच्या विरोधी पक्षाच्या प्रस्तावावरील चर्चे दरम्यान गोंधळ उडाला. दरम्यान, परराष्ट्र मंत्री एस. जयशंकर निवेदन देताना म्हणाले, सध्याचा संघर्ष भारतासाठीही चिंतेचा विषय आहे. आपण शेजारी आहोत आणि पश्चिम आशियात स्थिरता राखणे ही आपली जबाबदारी आहे. दहा लाख भारतीय आखाती देशांमध्ये राहतात आणि काम करतात. काही हजार भारतीय शिक्षणासाठी किंवा नोकरीसाठी इराणमध्ये आहेत. हा प्रदेश आपल्या ऊर्जा सुरक्षेसाठी महत्त्वाचा आहे आणि त्यात तेल आणि वायूचे अनेक आवश्यक पुरवठादार आहेत. पुरवठा साखळीतील व्यत्यय आणि अस्थिरता ही गंभीर समस्या आहेत. आपण दोन भारतीय खलाशी (व्यापारी शिपिंग) गमावले आहेत आणि एक अजूनही बेपत्ता आहे. १४ जानेवारी रोजी, मुंबईतील शिपिंग महासंचालनालयाने भारतीय खलाशांना दूतावासाच्या सल्ल्याचे पालन करण्याचा आणि किनाऱ्यावर अनावश्यक प्रवास टाळण्याचा सल्ला दिला. पश्चिम आशियातील आपल्या लोकांना परत आणण्यासाठी सर्वतोपरी प्रयत्न केले जात आहेत. ८ मार्चपर्यंत, आपल्या सुमारे ६७ हजार नागरिकांनी आंतरराष्ट्रीय सीमा ओलांडली होती. संबंधित मंत्रालये प्रतिसाद देण्यासाठी समन्वय साधत आहेत. युद्ध वाढतच आहे. या प्रदेशातील सुरक्षा परिस्थिती लक्षणीयरीत्या बिघडली आहे. खरं तर, लढाई इतर देशांमध्ये पसरली आहे, ज्यामुळे विनाश आणि मृत्यूंमध्ये वाढ झाली आहे. इस्रायल, अमेरिका आणि इराणमध्ये लढाई सुरू आहे.

# पंढरपुरात शासकीय कार्यालय चोरांनी फोडले: शहरामध्ये भीतीचे वातावरण

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर/प्रतिनिधी : पंढरपूर शहरातील मध्य भागातील असलेल्या दोन शासकीय कार्यालयांवर चोरट्याने डल्ला मारला. त्यामुळे काही मिळाले नाही कार्यालयातील कागदपत्रे विस्कटली मुळे शहरांमध्ये खळबळ उडाली आहे. परिसरातील भेटीचे वातावरण पसरले आहे पोलिसांनी रात्रीचे गस्त वाढवावे असे मागणी होत आहे.

पंढरपूर शहरातील मध्यवर्ती असलेल्या पत्रकार नगर मधील दरवाजाचे कुलूप उचकटून शासकीय कागदपत्राची नागदूस केली असता आता चोरांनी शासकीय कार्यालयाकडे हे आपला मोर्चा वळवला आहे. परिसरात भीतीचे वातावरण पसरले आहे.

दुसऱ्यांदा हे कार्यालय पडल्याचे चर्चा होत आहे. उद्या पोलीस यंत्रणा निष्क्रिय ठरत आहे. शहरामध्ये घोटी दादागिरी व भोवती चोऱ्या वाढत आहे मात्र याकडे पोलिसांची दुर्लक्ष आहे. दोन महिन्यापूर्वी कर्तव्यदक्ष सहाय्यक पोलीस अधीक्षक व पोलीस निरीक्षक या भुरट्या चोरांना भुरटे दादागिरीला चाप लावणार का, पोलीस अधीक्षक अधिकाऱ्यांनी ही अशा घटनेकडे गांभीर्याने लक्ष देणे गरजेचे आहे अशी मागणी नागरिकांतून होत आहे.

# 'लोकमंगल कृषी व्यवसाय व्यवस्थापन महाविद्यालयात,' बँकिंग व कृषी क्षेत्रातील उच्च शिक्षण संधीव्याख्यान संप

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर प्रतिनिधी : श्रीराम ग्रामीण संशोधन आणि विकास संस्था संचलित लोकमंगल कृषी व्यवसाय व्यवस्थापन महाविद्यालयात बँकिंग व कृषी क्षेत्रातील उच्च शिक्षण संधीया विषयावर मार्गदर्शन व्याख्यान आयोजित करण्यात आले होते. कार्यक्रमाची सुरुवात दीप प्रज्वलनाने व सरस्वती पूजनाने झाली. या कार्यक्रमाला व्याख्याते म्हणून महाविद्यालय की माजी विद्यार्थी तसेच महाविद्यालयाचे माजी



प्राध्यापक श्री प्रवीण शेळके सर उपस्थित होते व सध्या पंजाब नॅशनल बँक कलकत्ता येथील एग्रीकल्चर स्पेशालिस्ट ऑफिसर म्हणून कार्यरत आहेत त्यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना बँकिंग क्षेत्रातील संधी व कृषी व्यवसाय व्यवस्थापन शाखेबद्दल माहिती सांगितली तसेच कृषी कृषी व्यवसाय व्यवस्थापन या शाखे बद्दल माहिती सांगितली तसेच कृषी व्यवसाय व्यवस्थापन क्षेत्रात पदवीधरांसाठी मार्केटिंग तसेच शासकीय नोकरी यशस्वी उद्योजक होण्याबाबतचे मार्गदर्शन केले मार्गदर्शन करताना असताना विद्यार्थ्यांना बँकिंग मधील विविध पदाविषयी माहिती त्याचबरोबर पगाराविषयी माहिती कोणत्या पदासाठी कसा अभ्यास करावा याविषयी सखोल मार्गदर्शन केले यासोबतच त्यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना कृषी क्षेत्रातील उच्च शिक्षणासाठी तयारी कशी करावी विद्यार्थ्यांना त्यांना कोणकोणत्या स्पर्धा परीक्षा घ्याव्या लागतात, तसेच या परीक्षांच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना कोणकोणत्या शिष्यवृत्ती मिळू शकतात याविषयी मार्गदर्शन केले.त्यामध्ये प्रामुख्याने महाराष्ट्र कृषी शिक्षण परिषदेमार्फत या राष्ट्रीय कृषी संशोधन परिषदेचे मार्फत घेण्यात येणाऱ्या एमबीए एग्रीकल्चर व पी.एच.डी. कृषी या परीक्षा विषयी त्यामध्ये उत्तीर्ण होण्यासाठी आवश्यक तयारी विषयी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन, विद्यार्थ्यांनी विविध विषयांवर त्यांच्याशी चर्चा करून आपल्या शंकांचे निरसन करून घेतले. त्याने विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करत असताना तुम्ही तुमच्या स्वप्नावर ठाम राहा असे आव्हान केले कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी कृषी व्यवसाय व्यवस्थापन महाविद्यालयाचे प्राचार्य डॉक्टर सचिन फुगे सर होते. या कार्यक्रमास प्राध्यापक स्मिता धायगुडे प्राध्यापक अपूर्वा किसके तसेच महाविद्यालयातील सर्व विद्यार्थी उपस्थित होते कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व आभार प्राध्यापिका स्मिता धायगुडे यांनी केली.

# केंद्रीय लोकसेवा आयोगाच्या परीक्षेत बार्टीच्या ९ विद्यार्थ्यांचे यश

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पुणे : डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन व प्रशिक्षण संस्था (बार्टी), पुणे या महाराष्ट्र शासनाच्या सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाच्या स्वायत्त संस्थेमार्फत महाराष्ट्र राज्यातील अनुसूचित जातीतील विद्यार्थ्यांसाठी संघ लोकसेवा आयोग (युपीएससी) मार्फत घेण्यात येणाऱ्या परीक्षांचे पूर्व प्रशिक्षण देण्यात येते. तसेच मुख्य परीक्षा व मुलाखत चाचणी परीक्षेकरिता पात्र झालेल्या उमेदवारांना आर्थिक साहाय्य दिले जाते.

दि. ०६/०३/२०२६ रोजी जाहीर झालेल्या संघ लोकसेवा आयोग-नागरी सेवा - २०२५ परीक्षेच्या निकालात बार्टीच्या विद्यार्थ्यांनी यश संपादन केले.

असुन बार्टी संस्थेच्या विद्यार्थ्यांची निवड झाली असून विद्यार्थ्यांना खालील प्रमाणे रँक मिळाले आहेत.

१) रजत सुनील वाळके- रँक ५१४

२) गायकवाड बापूसाहेब रतन- रँक ५६१

३) भाले प्रीतमकुमार बाबुराव- रँक ७४२

४) झेंडे मनीष शिवाजी- रँक ७८८

५) रोजेकर भिकन जगन - रँक ८१२

६) शिंदे प्रथमेश दिलीप - रँक ८१७

७) राजूरकर अतुल अनिल - रँक ८६३

८) बोरकर सुरेश लीलाधरराव - रँक ९१२

९)सांगळे रोहित नरेश - रँक ८६५

संघ लोकसेवा आयोग-नागरी सेवा - २०२५ मुख्य परीक्षेकरीता १९५ विद्यार्थ्यांनी आर्थिक सहाय्य व त्यापैकी ३४ विद्यार्थ्यांनी मुलाखत आर्थिक सहाय्य योजनेचा लाभ घेतला होता.

या सर्व विद्यार्थ्यांना बार्टी कडून परीक्षेच्या विविध टप्प्यावर मार्गदर्शन व आर्थिक साहाय्य देण्यात आले आहे..

बार्टी संस्थेच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना गुणवत्ता आणि कौशल्यवृध्दीच्या दिशेने चालना देण्याचे काम आम्ही सातत्याने करत आहोत..यंदा नागरी सेवा परीक्षेतील विद्यार्थ्यांचे यश हे बार्टी संस्थेच्या प्रयत्नांची फलश्रुती आहे असे बार्टीचे महासंचालक श्री. सुनील वारे यांनी सांगितले.

युपीएससी विभागाला सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाचे मंत्री ना संजयजी शिरसाट, प्रधान सचिव डॉ हर्षदीप कांबळे यांचे वेळोवेळी मार्गदर्शन लाभले. त्यामुळेच हे यश संपादन करता आले असे मा.महासंचालक बार्टी, पुणे यांनी सांगितले.

बार्टीचे महासंचालक श्री. सुनील वारे, निबंधक डॉ सुचिता शिंदे व विभागप्रमुख श्रीमती.शुभांगी पाटील यांनी सर्व यशस्वी विद्यार्थ्यांचे अभिनंदन करून त्यांना पुढील वाटचालीकरिता हार्दिक शुभेच्छा दिल्या.

# जि. प. प्राथ. मराठी केंद्रशाळा दुधनी येथे महिला सक्षमीकरण सप्ताह व जागतिक महिला दिवस जल्लोषात साजरा

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

दुधनी : आज जिल्हा परिषद प्राथमिक मराठी केंद्र शाळा दुधनी येथे महिला सक्षमीकरण सप्ताह व जागतिक महिला दिन शेकडो महिलांच्या उपस्थित थाटामाटात संपन्न झाले.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी कर्तृत्ववान महिला अंबिकाबाई कोलाटी होत्या.

कार्यक्रमाची सुरुवात राष्ट्रगीत व राज्यगीताने झाली. क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले व राजमाता जिजाऊ यांच्या प्रतिमेचे पुजन व दीपप्रज्वलन करून कार्यक्रमाची सुरुवात केली.

सर्व माता पालक यांचे मुख्याध्यापक श्री.पोमू राठोड यांनी स्वागत केले. आदर्श माता म्हणून अंबिकाबाई कोलाटी यांचा सत्कार करण्यात आला.



आरोग्य,पोषण व स्वच्छता मार्गदर्शन,मासिक पाळी जनजागृती विषयक आरोग्य अधिकारी डॉ.सपना दिन्नी व स्टाफ नर्स ललिता बंदिचौडे यांनी मार्गदर्शन केले.यावेळी विद्यार्थी सुरक्षा विषयक उपाययोजना मार्गदर्शन, सायबर सुरक्षितता,झजउडज कायदा माहिती, कायदेविषयक जनजागृती,महिलांचे संबंधित कायदे, शिक्षणाचा हक्क समानता हक्क याविषयी मुख्याध्यापक पोमू राठोड यांनी मार्गदर्शन केले.विविध स्पर्धा, मनोरंजन खेळ,मेहंदी , संगीत खुर्ची,लिंबू चमचा रांगोळी व फुगे फोडणे यामध्ये माता पालकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला.

शाळेतील विद्यार्थ्यांनी कर्तुत्ववान महिलांचे वेशभूषा परिधान करून मातांचे मने जिंकली, वेशभूषा स्पर्धांमध्ये उत्कृष्ट वेशभूषेसाठी बक्षीस देण्यात आले.कर्तृत्ववान महिलांचे वेशभूषा परिधान करून व त्यांच्याविषयी माहिती देताना उपस्थित महिला टाळ्यांच्या गजराने परीसर दुमदुमून गेला. विविध स्पर्धेत भाग घेतलेल्या मातांना प्रथम क्रमांक व द्वितीय क्रमांक आलेल्या माता पालक यांना अक्कलकोट तालुक्याचे गटशिक्षणाधिकारी प्रशांत अरबाळे यांच्या हस्ते बक्षिसे देऊन सत्कार करण्यात आले. यावेळी बोलताना. प्रशांत अरबाळे म्हणाले तुमच्या कार्याचे कौतुक करावे तेवढे कमीच आहे,सर्व शिक्षकांचे तोंडभरून कौतुक करत शाबासकीची थाप दिली. शाळेसाठी सर्वतोपरी सहकार्य करण्याचे आवाहन केले.

यावेळी माता पालक म्हणून कावेरी झळकी,मलम्मा मोडलकर, विजयालक्ष्मी कामनळ्ळी, अंबिका कोटनूर, अफरा चौधरी, अंबिका गोटे, भूवनेश्वरी गळवे, धानम्मा रोडगे, गीता कोगनूर, ऐश्वर्या अल्लापूर, रेश्मा माशाळ, अंबिका सिन्नूर, रिजवान बडेखा, लक्ष्मी चिणमगेरी,सायरा शेख,जिलेखा चौधरी, अंबिका माशाळ अमिना मोमीन, नाझमीन गौर, पपिता बागडे, प्रिया गौर, यास्मिन शेखजी, प्रियंका गोटे, कावेरी केरूर, रंगूबाई बोनार, अमिना मोमीन, सुरेखा परमगोळ, कावेरी कोळी, रेणूका टेंगळे, कल्पना झळकी, ललित निंबाळ, कस्तुराबाई गंगावती सैदप्पा झळकी, गणेश ओहोळ बसवराज शावरी पालक इत्यादी शेकडो आदर्श महिला उपस्थित होत्या. कार्यक्रम यशस्वी होण्यासाठी जेष्ठ शिक्षिका शोभा म्हेत्रे, रविकुमार कोरचगाव यांचे सहकार्य लाभले तर सुत्रसंचालन उपक्रमशील शिक्षिका अंजली गुंजोटे यांनी केले तर संजीवकुमार बेण्णेसूर आभार मानले.

# श्री क्षेत्र कानिफनाथ गडावर रंगला रंगपंचमी आनंदोत्सव सोहळा

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**



पुरंदर प्रतिनिधी/ डॉ. विनायक गायकवाड : असे श्रद्धा ज्याचे उरी त्यासी दिसे कानिफा मुरारी लाखो भाविकांचे श्रद्धास्थान असलेल्या बोपगाव (ता. पुरंदर) येथील कानिफनाथ गडावर 'रंगपंचमी आनंदोत्सव यात्रा' पारंपरिक पद्धतीने साजरी झाली.

पहाटे मंदिरात नवनाथ देवस्थान पंच कमिटी ट्रस्टच्या वतीने पूजा, अभिषेक करण्यात आला. दुपारी १२ वाजता नाथांची आरती झाली. त्यानंतर पारंपरिक वाद्यांच्या गजरात प्रथम देवांच्या अंगावर रंग शिंपण्यात आला. मंदिराच्या शिखरावरून भाविकांच्या अंगावर रंगांचे शिंपण करण्यात आले. यावेळी मंदिर परिसरात भाविकांनी गर्दी केली होती. सकाळी ९ वाजता बोपगाव येथून पालखी-काठी कानिफनाथ मंदिरावर गेली. त्यानंतर सासवड, भिवरी, गराडे, चांबळी, औताडवाडी, होळकरवाडी, वडकी, उरुळी देवाची येथील मानाच्या शिखर काठ्यांनी रंगपंचमी आनंदोत्सव यात्रेत सहभाग घेतला. वाजत यात्रेचे आयोजन श्री नवनाथ देवस्थान पंच कमिटी ट्रस्टचे अध्यक्ष ज्ञानोबा फडतरे, उपाध्यक्ष दीपक फडतरे, सचिव जयवंत फडतरे, खजिनदार नागेश फडतरे, विश्वस्त शिवाजी जगदाळे, प्रकाश फडतरे, सुरेश फडतरे, महादेव फडतरे, नितीन फडतरे, रमेश फडतरे, संतोष गोफणे, पांडुरंग बाठे, विनायक गायकवाड, उत्तम फडतरे, शिवाजी फडतरे, तुकाराम फडतरे आदींनी केले होते.

# केंद्रीय लोकसेवा आयोगाच्या नागरी सेवा परीक्षेत महाराष्ट्रातील साठाहून अधिक उमेदवार यशस्वी

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

नवी दिल्ली : केंद्रीय लोकसेवा आयोगातर्फे घेण्यात आलेल्या नागरी सेवा परीक्षा -२०२५ मध्ये देशातील एकूण ९५८ उमेदवार यशस्वी झाले आहेत. यात राज्यातील ६० हून अधिक उमेदवारांचा समावेश आहे.

केंद्रीय लोकसेवा आयोगाने घेतलेल्या वर्ष २०२५ च्या नागरी सेवा मुख्य परीक्षेचा अंतिम निकाल शुक्रवारी जाहीर झाला. या निकालात पहिल्या १०० उमेदवारांमध्ये महाराष्ट्रातील पाच उमेदवारांचा समावेश आहे. ऋषीकेश आलासे ६१ ,आकाश त्रिवेदी यांनी ७३, गौरव चोपडा यांनी ८३, सायली पगार यांनी ८७, वा तर दिक्षा पाटकर यांनी ८८ वा क्रमांक पटकावला आहे.

**यशस्वी उमेदवारांची यादी**



हृषीकेश आलासे (६१) आकाश त्रिवेदी (७३) गौरव चोप्रा (८३) सायली पगार (८७), दीक्षा पाटकर (८८), ऋतुजा गायकवाड (१०६), वरुण टोकस (११७), अंकिता अनिल पाटील (१४०), आर्यन सिरसीकर (१७५), कार्तिक बच्छाव (१७७), राहुल पाटील (२२४), शुभम शरद बेहेरे (२२६), ऋषिकेश पालिमकर (२८३), मोहिनी जगताप (३२३), अभिषेक ओझार्डे (३३६), हर्षवर्धन पाटील (३४९), हर्षवर्धन तिडके (३५५), कुणाल अहिरराव (४३०), अभिषेक मगदूम (४४९), धनश्री अहिरे (४८९), मनोज पाटील (४९३), विशाखा कदम (५०४), नंदिनी पाटील (५१२), रजत वाळके (५१४), निखिल तांबे (५१७), श्रुती चव्हाण (५२७), धनंजय दिघे (५२९), संकेत कुंभार (५३९), साईराज पाटील (५४५), आरुषा पाटील (५५३), पारस मिस्त्री (५५५), बापूसाहेब गायकवाड (५६१), प्रवीण कोळपे (५८४), अविष्कार डेर्ले (५९१), रोहित माळवेकर (६०१), अभिषेक टेकाडे (६१०), सिद्धार्थ तागड (६१९), भाग्यश्री नायकेले (६४७), शिवम वखारे (६५१), पांडुरंग कांबळी (६६०), अश्विनी कोळेकर (६७५), प्रज्वल नासरे (६७७), अल्पेश ढवळे (६८७), सूरज सूर्यवंशी (७०२), रामेश्वर शिंदे (७०५), बसवराज पाटील (७३९), प्रीतकुमार भाले (७४२), राजश्री देशमुख (७५४), चेतन ठाकरे (७६२), प्रांजली मेश्राम (७६७), मनीष झेंडे (७८८), प्रथमेश शिंदे (८१७), राहुल चांडोलकर (८३१), हेमकृष्ण पिसाडे (८४९), अतुल राजुरकर (८६३), रोहित सांगळे (८६५), सुरेश बोरकर (९१२), प्रेरणा खवले (९१३), अनिकेत अहिरे (९४१)

केंद्र शासनाच्या विविध सेवांमधील रिक्त जागांसाठी ऑगस्ट २०२५ मध्ये मुख्य परीक्षा घेण्यात आली. डिसेंबर २०२५- फेब्रुवारी २०२६ दरम्यान परिक्षेत उत्तीर्ण झालेल्या उमेदवारांच्या मुलाखती घेण्यात आल्या. या परिक्षेच्या निकालातील उत्तीर्ण ९५८ उमेदवारांची केंद्रीय लोकसेवा आयोगाने विविध सेवेतील पदांच्या नियुक्तीसाठी शिफारस केली आहे. यामध्ये सामान्य (ओपन) गटातून -३१७, आर्थिक मागास प्रवर्गातून (ईडब्ल्यूएस) १०४, इतर मागासवर्गीय प्रवर्गातून (ओबीसी) - ३०६, अनुसूचित जाती प्रवर्गातून (एससी) - १५८, अनुसूचित जमाती प्रवर्गातून-७३ उमेदवारांचा समावेश आहे. लोकसेवा आयोगाने २५८ उमेदवारांची आरक्षित सूची (Reserve List) तयार केली आहे. यामध्ये सामान्य गट- १२९, आर्थिक मागास प्रवर्ग (ईडब्ल्यूएस)- २६, इतर मागास वर्ग -८६, अनुसूचित जाती- ०८, अनुसूचित जमाती - ०६ उमेदवारांचा समावेश आहे. यासोबत एकूण तीन दिव्यांग उमेदवारांचा समावेश आहे.

**या रिक्त पदांवर उमेदवार होतील रूजू**

भारतीय प्रशासन सेवा (आयएएस) या सेवेत शासनाकडे एकूण -१८० जागा रिक्त आहेत. यामध्ये सामान्य गट (जनरल) - ७४, आर्थिक मागास प्रवर्ग (ईडब्ल्यूएस) १८इतर मागास वर्ग (ओबीसी) -४७, अनुसूचित जाती (एससी) - २८, अनुसूचित जमाती (एसटी) १३ जागा रिक्त आहेत. उमेदवारांच्या गुणानुक्रमे रिक्त जागांवर यशस्वी उमेदवारांची निवड केली जाईल.

भारतीय विदेश सेवा (आयएफएस) या सेवेत शासनाकडे एकूण - ५५ जागा रिक्त आहेत. यामध्ये सामान्य गट (ओपन) - २२, आर्थिक मागास प्रवर्ग(ईडब्ल्यूएस) ०६, इतर मागास वर्ग (ओबीसी) - १५, अनुसूचित जाती (एससी) - ०८, अनुसूचित जमाती (एस.टी.) - ०४ जागा रिक्त आहेत.

भारतीय पोलिस सेवा (आयपीएस) या सेवेमध्ये एकूण - १५० जागा रिक्त आहेत, यामध्ये सामान्य गटातून (ओपन) - ६०, आर्थिक मागास प्रवर्ग (ईडब्ल्यूएस) १५, इतर मागास प्रवर्गातून - ४२, अनुसूचित जाती प्रवर्गातून - २२, तर अनुसूचित जमाती प्रवर्गातून - ११ उमेदवारांना नियुक्ती दिली जाणार आहे.

केंद्रीय सेवा गट अ - या सेवेमध्ये एकूण - ५०७ जागा रिक्त आहेत. यामध्ये सामान्य गटातून (ओपन) - २११, आर्थिक मागास प्रवर्ग (ईडब्ल्यूएस) ४८ , इतर मागास प्रवर्गातून -१४१, अनुसूचित जाती प्रवर्गातून - ७३ तर अनुसूचित जमाती प्रवर्गातून -३४ उमेदवारांना नियुक्ती देण्यात येईल.

केंद्रीय सेवा गट ब - या सेवेमध्ये एकूण - १९५ जागा रिक्त आहेत. यामध्ये सामान्य गटातून (ओपन) - ७९, आर्थिक मागास प्रवर्ग(ईडब्ल्यूएस) १७ उमेदवार, इतर मागास प्रवर्गातून - ६१, अनुसूचित जाती प्रवर्गातून - २७ तर अनुसूचित जमाती प्रवर्गातून -११ उमेदवारांना नियुक्ती दिली जाईल.

एकूण ३४८ उमेदवारांची निवड तात्पुरत्या स्वरुपाची असेल. अधिकृत निकाल व यशस्वी उमदेवारांची नावे केंद्रीय लोकसेवा आयोगाच्या ु.ीींिल. सेीं.ळप या संकेतस्थळावर उपलब्ध आहेत.

हे वृत्तपत्र मालक, सिद्धार्थ सोशल फौंडेशन यांनी मुद्रक, प्रकाशक, संपादक कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे यांच्या सम्यक पब्लिकेशन अँड प्रिंटर्स २४७, बुद्ध विहार, रमाबाई आंबेडकर नगर, बुधवार पेठ, सोलापूर ४१३००२ महाराष्ट्र येथे छापून मु. पो. गोगांव ता. अक्कलकोट जि. सोलापूर ४१३२१८ महाराष्ट्र येथे प्रकाशित केले. **संपादक : कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे** ई-मेल - yashsiddhinews@gmail.com www.yashsiddhinews.com Mo. 9921988358

This Newspaper is printed by the Owner Shidharth Social Foundation, Printer, Publisher, Editor Kamalakar Dayndev Sonakamble at Samyak Publications and Printers 247, Budha Vihar, Ramabai Ambedkar Nagar, Budhwar Peth Solapur-413002 (Maharashtra), Published, at Gogaon Tal Akkalkot Dist Solapur 413218 (Maharashtra). Editor : Kamalakar Dayndev Sonakamble

■ **प्रशासकीय कार्यालय** : सम्यक उद्योग समूह, पृथ्वी एंटरप्राइजेस, सर्वे नं. ६५९/८, शॉप नं. ४, राजीव गांधी नगर, न्यू अप्पर बस स्टॉप, बिबवेवाडी पुणे-३७ ■ **विभागीय कार्यालय** : प्रबुद्ध इंटरप्राइजेस, दुकान नं. २ अमरधान चौक, खेमानी उल्हासनगर ४२१००२

# भारतीय क्रिकेट संघाच्या ऐतिहासिक विजयाचा पनवेलमध्ये जल्लोष






## ॲम्बुलन्स चालक-मालक जनहित संस्थेची भव्य विजयी रॅली

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पनवेल/केतन भोज : इंडिया टीम ने ICC T20 वर्ल्ड कप स्पर्धेत तिसऱ्यांदा ऐतिहासिक विजय मिळवत संपूर्ण देशाचा अभिमान उंचावला आहे. आतापर्यंत कोणत्याही देशाने तीन वेळा टी-२० विश्वचषक जिंकण्याची किमया साधलेली नव्हती.भारताने ही अभूतपूर्व कामगिरी करत क्रिकेट विश्वात आपले वर्चस्व पुन्हा एकदा सिद्ध केले आहे.या ऐतिहासिक विजयामुळे संपूर्ण देशभरात आनंदाचे आणि उत्साहाचे वातावरण निर्माण झाले असून प्रत्येक भारतीयाला आपल्या क्रिकेट संघाचा अभिमान वाटत आहे. या अभिमानाच्या भावनेतून पनवेल शहरातील ॲम्बुलन्स चालक-मालक जनहित संस्थेच्या वतीने भव्य विजयी रॅलीचे आयोजन करण्यात आले.या रॅलीद्वारे संस्थेच्या सदस्यांनी भारतीय क्रिकेट संघाला मानाचा मुजरा देत त्यांच्या विजयाला सलामी दिली. रॅलीदरम्यान म्बुलन्स वाहनांना तिरंगा ध्वज लावून शहरातून फेरी काढण्यात आली. भारत माता की जय, जय हिंद, जय भारत, भारतीय क्रिकेट संघाचा विजय असो अशा घोषणांनी परिसर दुमदुमून गेला आणि नागरिकांमध्येही देशभक्तीची भावना जागृत झाली. रॅलीमध्ये संस्थेचे अध्यक्ष मुकुंद कांबळे, सचिव विजय जाधव, उपाध्यक्ष प्रकाश जाधव, पनवेलचे सचिव राज निम्बर्गी, सहखजिनदार कैलास नेमाडे, पनवेलचे खजिनदार भरत पाटील यांच्यासह संतोष निम्बर्गी, अनिकेत नेमाडे, संजय जाधव, गणेश खंदारे, हरीश कांबळे, ज्ञानेश्वर जाधव,तनवी विजय जाधव, पूर्वी विजय जाधव आणि इतर अनेक सदस्य मोठ्या उत्साहात सहभागी झाले होते. या सर्व सदस्यांच्या उपस्थितीमुळे रॅलीची शोभा अधिकच वाढली.या वेळी संस्थेच्या पदाधिकाऱ्यांनी सांगितले की, भारतीय क्रिकेट संघाने देशासाठी मिळवलेला हा विजय प्रत्येक भारतीयासाठी अभिमानाचा क्षण आहे. खेळाडूंनी दाखवलेली मेहनत, जिद्द आणि देशासाठी खेळण्याची भावना ही प्रेरणादायी असून तरुण पिढीला त्यातून मोठा संदेश मिळतो.त्यामुळेच पनवेलमधील ॲम्बुलन्स चालक-मालकांनी आपल्या पद्धतीने हा आनंद साजरा करत भारतीय संघाला सलामी देण्याचा निर्णय घेतला. या विजयी रॅलीमुळे पनवेल शहरात उत्साहाचे वातावरण निर्माण झाले होते. नागरिकांनीही रॅलीचे स्वागत करत भारतीय क्रिकेट संघाच्या या ऐतिहासिक यशाबद्दल आनंद व्यक्त केला. देशाच्या गौरवासाठी खेळणाऱ्या खेळाडूंना सलाम करत सर्वांनी एकमुखाने जय हिंद, जय भारतच्या घोषणा दिल्या.

# निफाडला आजपासून दोन दिवसीय नाशिक ग्रंथोत्सवाचे आयोजन

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

निफाड/प्रतिनिधी : राज्य शासनाच्या उच्च व तंत्र शिक्षण विभाग, ग्रंथालय संचनालय महाराष्ट्र राज्य मुंबई, तसेच जिल्हा ग्रंथालय अधिकारी कार्यालय नाशिक, व माणकेश्वर वाचनालय निफाड यांच्या संयुक्त विद्यमाने नाशिक ग्रंथोत्सोव दि १० व११ मार्च २०२६ रोजी कृषी उत्पन्न बाजार समिती निफाड बस स्थानक जवळ येथे आयोजित करण्यात आले आहे ,या कार्यक्रमाला वाचक व नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित रहावे असे आव्हान जिल्हा ग्रंथालय अधिकारी सुनील जगताप , माणकेश्वर वाचनालयाचे अध्यक्ष मधुकर शेलार यांनी प्रसिद्धी पत्रकाद्वारे केले आहे, ग्रंथोत्सवाचा प्रारंभी १० मार्च रोजी सकाळी नऊ वाजता श्री माणकेश्वर सार्वजनिक वाचनालय येथून भव्य ग्रंथ दिंडी काढण्यात येणार आहे, ही दिंडी पेट गल्ली ,शनी मंदिर, त्यानंतर छत्रपती शिवाजी महाराज चौक, बस स्टॅन्ड मार्गे ,मार्केट कमिटी हॉल निफाड येथे समारोप होणार आहे, त्यानंतर सकाळी साडेदहा वाजता ग्रंथोत्सव व ग्रंथ दालनाचे उद्घाटन कृषी उत्पन्न बाजार समिती मार्केट कमिटी हॉल निफाड येथे अन्न व नागरी पुरवठा मंत्री ना.छगनराव भुजबळ, शालेय शिक्षण मंत्रीआ. दादाजी भुसे, अन्न व औषध प्रशासन मंत्री नरहरी झिरवाळ, आमदार दिलीप काका बनकर ,सुहासजी कांदे , शोभाताई बच्छाव, आ. सत्यजित तांबे, आमदार ॲड माणिकराव कोकाटे, खासदार भास्कर भगरे नाशिकच्या महापौर हिमगौरी आहेर/ आडके आदी मान्यवरांच्या हस्ते होणार आहे याप्रसंगी नाशिक जिल्ह्यातील पुरस्कार प्राप्त ग्रंथालयांचा सन्मान या वेळी करण्यात येणार आहे ,ग्रामीण व शहरी भागातील नागरिकांमध्ये वाचन संस्कृती दृढ व्हावी या उद्देशाने विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे दुपारी २ /३० मिनिटांनी ते ५ या वेळेत निमंत्रितांचे. कवी संमेलन आयोजित करण्यात आले असून कवी लक्ष्मण महाडीक,हे अध्यक्ष असणारं आहे , आहे ११मार्च रोजी सकाळीचे सत्रात १०/३०ते १२/३० या वेळेत सोशल मीडिया व आजची युवा पिढी या विषयावर परिसंवाद होणार असून याचे प्रमुख वक्ते प्रा.महेश बनकर हे आहेत, दुपारच्या सत्रात वंदे मातरम वाचकांचा सत्कार माणकेश्वर वाचनालयाचे अध्यक्ष मधुकर शेलार,तर कृषी उत्पन्न बाजार समितीचे संचालक राजेंद्र ढोकळे निफाड महाविद्यालय याचे प्राचार्य एस एन शिंदे ,हे प्रमुख अतिथी म्हणून उपस्थित राहणार आहे, पुण्यश्लोक अहिल्याबाई होळकर - लोक कल्याणाचा आदर्श या विषयावर युवा भारूडकार मयूर देशमुख यांचा भारुड व प्रबोधन कार्यक्रम होणार आहे सायंकाळी ४ वाजता ग्रंथोत्सव समारोप होणार आहे ग्रंथ प्रेमींना विविध कार्यक्रमाचा आस्वाद विनामूल्य घेता येणार असून पुस्तक विक्रेते वितरक व प्रकाशक यांच्यासाठी ग्रंथ विक्री स्टॉल उपलब्ध करून देण्यात येणार आहेत.

# माढा शहरात इनिडोअर स्टेडियमचे भूमिपूजन



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर/प्रतिनिधी : माढा तालुक्यातील गुणवंत खेळाडूंना हक्काचे व्यासपीठ मिळावे आणि त्यांना आधुनिक सोयी सुविधा उपलब्ध व्हाव्यात या उद्देशाने माडा शहरात क्रीडा संकुलाच्या कामाची भूमिपूजन आमदार अभिजीत पाटील यांच्या हस्ते करण्यात आले यावेळी माढ्याच्या नगराध्यक्ष मीनल साठे उपस्थित होत्या.

गेल्या १८ वर्षापासून माळ्याच्या क्रीडा संकुलाचा प्रश्न रंग आलेला होता त्याचा पाठपुरावा करून आराखडा तयार होऊन आज भूमिपूजन होत असल्याबद्दल मनापासून आनंद होत आहे माढा तालुक्यातील गुणवंत खेळाडूंना हक्काचं व्यासपीठ मिळावं आणि त्यांना आधुनिक सोयी सुविधा उपलब्ध व्हाव्यात यासाठी यांचा नक्कीच फायदा होणार आहे असे आमदार अमित पाटील यांनी सांगितले.

यासाठी जवळपास तीन कोटी रुपयांचा निधी मंजूर झाला असून अजून पुढे निधी आणण्यासाठी आपण प्रयत्नशील आहोत क्रीडा संकुलात इनिडोअर हॉल, रनिंग ट्रॅक क्रीडांगण स्वच्छतागृह

अभ्यासिका पुरुष व महिलांसाठी स्वतंत्र जिम, प्रशस्त हॉल चेंजिंग रूम यासह अद्यावत सोयी असणार आहेती यामुळे नक्कीच माढा शहर क्रीडा परंपरेची नवी उंची वाटेल असा विश्वास आमदार अभिजीत पाटील यांनी व्यक्त केला.

# निफाडमध्ये 'सखीरंग उत्सव' उत्साहात; महिला दिन व रंगपंचमीचा दुहेरी आनंद



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

निफाड/प्रतिनिधी : जागतिक महिला दिन आणि रंगपंचमीचे औचित्य साधून निफाड शहरातील प्रभाग क्रमांक १२ मध्ये माजी नगरसेवक देवदत्त कापसे यांच्या युवा मंचच्या वतीने आयोजित करण्यात आलेला सखीरंग उत्सव महिलांच्या उत्स्फूर्त सहभागात संपन्न झाला.

रविवारी दुपारी ४.०० ते सायंकाळी ६.३० या वेळेत पार पडलेल्या या कार्यक्रमात परिसरातील महिला व युवती मोठ्या संख्येने उपस्थित राहून रंगपंचमीचे रंग आणि महिला दिनाचा उत्साह एकत्र साजरा केला.

कार्यक्रमाची सुरुवात उपस्थित महिलांच्या स्वागताने करण्यात आली. यावेळी महिलांनी एकमेकींना रंग लावत मैत्री, प्रेम आणि आपुलकीचे रंग उधळले. विविध मनोरंजनात्मक खेळ, सांस्कृतिक उपक्रम आणि उत्साहवर्धक कार्यक्रमांमुळे परिसरात आनंदाचे आणि उत्साहाचे वातावरण निर्माण झाले.

कार्यक्रम यशस्वी होण्यासाठी देवदत्तभाऊ कापसे युवा मंचच्या कार्यकर्त्यांनी विशेष परिश्रम घेतले. उपस्थित महिलांनीही या उपक्रमाचे कौतुक करत भविष्यातही अशा कार्यक्रमांचे आयोजन व्हावे, अशी अपेक्षा व्यक्त केली.

महिला दिन आणि रंगपंचमीचा दुहेरी आनंद देणारा 'सखीरंग उत्सव' महिलांसाठी आनंददायी व संस्मरणीय सोहळा ठरला.

# विठ्ठल कारखान्यातर्फे सभासदांना स्वस्त दरात साखर

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**



पंढरपूर/प्रतिनिधी : श्री विठ्ठल सहकारी साखर कारखान्याच्या वतीने गुढीपाडव्या सणानिमित्त सर्व सभासदांना २०२५ /२६ ऊस पुरवठा केलेल्या सर्व पुरवठा व कामगारांना २५ किलो पॅकिंग, रुपये ३० प्रति किलो या दराप्रमाणे, सभासद व कामगारांना वाटप करण्यात येणार असल्याचे श्री विठ्ठल सहकारी साखर कारखाना चेअरमन तथा माडे चे आमदार अभिजीत पाटील यांनी यांनी जाहीर केले.

दरम्यान पंढरपूर येथील साखर केंद्राचे उद्घाटन ज्येष्ठ संचालक दिनकर (दाजी )चव्हाण वसंत मुक्ताबाई मठाचे व्यवस्थापक शशिकांत पाटील, वास्तु शिल्प चे मालक तथा निशिगंधा बँकेचे चेअरमन अर .बी .जाधव व सेवानिवृत्त कार्यकारी अभियंता तथा संभाजी ब्रिगेडचे जिल्हाध्यक्ष विश्वंभर काशीद, आनंद बापू पाटील, व श्री स्वामी समर्थ हॉस्पिटलचे गजानन मेडिकलचे मालक गजानन बापू पागल यांच्या हस्ते करण्यात आले.

कारखाना साइटवर साखर केंद्राचे उद्घाटन संचालक प्रवीण कोळेकर व सिद्धेश्वर बंडगर, वर्क मॅनेजर यु .के .तावरे चीफ केमिस्ट बि. आर. माने, ,निघाला ऑफिसर ओ.जे. अवधूत, शिपा कॉन्टॅक्ट शिंदे, शुगर सेल अधिकारी महेश घाडगे, हेअर टाईम कीपर एस एस जगताप, व इतर अधिकारी यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी सर्व ठेकेदार ऊस उत्पादक सभासद कामगार सर्व सभासदांनी कोकणावर नमूद केलेल्या मूर्तीमध्ये साखर घेऊन जावे असे यावेळी संचालक मंडळाकडून करण्यात आले.

**या ठिकाणच्या केंद्रावर मिळणार साखर**

बुधवार दिनांक ४ ते ३१ मार्च पर्यंत कारखाना साइटवर विठ्ठल कॅन्टीन शेजारी पंढरपूरमध्ये, समृद्धी ट्रॅक्टर शोरूम कॉलेज रोड, पंढरपूर येथे वाटप चालू राहील. त्याचबरोबर मंगळवेढा मोहोळ सांगोला, माळशिरस, ऊस पुरवठादार यांनी पंढरपूर येथील साखर वाटप केंद्रातून साखर कुपवांवर केलेल्या मूर्तीमध्ये साखर घेऊन जावे तसेच माढा परंडा करमाळा गेटकीण माढा विभाग कुर्डूवाडी शेटफळ रोड, शिव संकल्प गौरी प्लाझा, हॉटेल सुमित समोर टेंभुर्णी , लवूळ विभाग मौजे गट ऑफिस कुर्डूवाडी पंढरपूर रोडवर, लऊळ येथे साखर वाटप केंद्र चालू केली आहे. दिनांक पाच ते अठरा मार्चपर्यंत साखर चालू राहील.

## फुले शाहू आंबेडकराईट स्टडी फाउंडेशनची १६० वी शतकोत्तर मोफत वैचारिक प्रबोधनात्मक कार्यशाळा संपन्न

# सुशिक्षित करा, संघर्ष करा आणि संघटित व्हा हीच चळवळीची खरी त्रिसूत्री होय : बी. बी. मेश्राम

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

छत्रपती संभाजी नगर/प्रतिनिधी : फुले शाहू आंबेडकराईट स्टडी फाउंडेशन व दि ऑल इंडिया नाग संघाच्या संयुक्त विद्यमाने मी मिळविलेल्या ज्ञानसत्तीचा उपयोग केवळ कुटुंबापुरता मर्यादित न ठेवता समाजाची सर्वांगीण प्रगती व्हावी म्हणून कसोशीने व प्रामाणिकपणे प्रयत्न करणार आहे. या डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या विधानाच्या १०२ व्या वर्धापन दिनानिमित्त सदरील ऐतिहासिक, प्रासंगिक विषयावर १६० वी शतकोत्तर मोफत वैचारीक प्रबोधनात्मक साप्ताहिक कार्यशाळा संस्थेचे कार्यालय साकेत नगर, छत्रपती संभाजीनगर येथे ८ मार्च २०२६ ला संपन्न झाली.

फुले, शाहू, आंबेडकराईट स्टडी फाउंडेशनचे संचालक बी. बी. मेश्राम अध्यक्षीय मार्गदर्शन करताना म्हणाले की, ९ मार्च १९११ पासून युरोपियन देशात जागतिक महिला दिन साजरा केला जात होता. ८ मार्च १९१७ ला रशियात कामगारांनी ब्रेड व शांती साठी स्ट्राईक केला होता. व्लादिमीर लेनिन यांनी १९२२ ला जागतिक महिला दिन जाहीर केला होता. ८ मार्च १८७५ ला युनो ने मान्यता दिलेली आहे. त्यामुळे ८ मार्च ला जागतिक महिला दिन साजरा केला जातो. २० जुलै १९४२ ला नागपूरच्या महिला परिषदेत बोलताना बाबासाहेब म्हणाले होते की, कोणत्याही समाजाची प्रगती त्या समाजात महिलांच्या झालेल्या प्रगतीवरून मी मोजत असतो. त्याची पूर्तता करण्यासाठी भारताचे संविधानात महिलांसाठी अनेक तरतुदी केल्यात त्यातील प्रमुख तरतूद म्हणजे समानतेची होय. तसेच ९ मार्च १९२४ ला डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी बहुजन समाजाच्या उत्थानासाठी केंद्रीय संस्था निर्माण करण्याचे अनुषंगाने मुंबईच्या दामोदर हॉल येथे बैठकीचे आयोजन केले होते, ज्यात एर्वीलरींश, सळींरींश रपव जीसरपळीश अर्थात सुशिक्षित करा, संघर्ष करा आणि संघटित व्हा असा संदेश दिला होता. हाच संदेश पुढे चालून बहिष्कृत हितकारिणी सभेचे ब्रीदवाक्य ठरले. या त्रिसूत्रीला डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी २० जुलै १९४२ ला नागपूर परिषदेत सुशिक्षित करा, संघर्ष करा, संघटीत व्हा, आत्मविश्वास बाळगा आणि कधी धीर सोडू नका या पंचसूत्रीत विस्तारित केलेले आहे. तसेच ९ मार्च १९२४ ला बाबासाहेबांनी मी मिळविलेल्या ज्ञान सत्तीचा उपयोग केवळ कुटुंबापुरता मर्यादित न ठेवता समाजाच्या सर्वांगीण प्रगती व्हावी म्हणून कसोशीने व प्रामाणिकपणे प्रयत्न करणार आहे. असे जाहीर केले होते. या कृतीच्या १०२ व्या वर्धापन दिनानिमित्त आपण ही कार्यशाळा आयोजित केलेली आहे. जेणेकरून ऐतिहासिक संदर्भाची वर्तमान प्रासंगिकता आणि भविष्यकालीन आवश्यकतेचे मर्म आपणास समजून घेता येईल.

उद्घाटनपर मार्गदर्शन करतांना प्रियाताई खंडागळे म्हणाल्या की, जागतिक महिला दिनाच्या अनुषंगाने विचार करता बाबासाहेब आंबेडकरांच्या महत्प्रयासाने महिलांना समानतेचे हक्क भारताचे संविधानामार्फत प्राप्त झाले. त्यामुळे द्रौपदी मूर्मू राष्ट्रपती तर इंदिरा गांधी सारख्या महिला प्रधानमंत्री होऊ शकल्या तसेच अनेक क्षेत्रात महिलांना कर्तुत्व गाजवण्यासाठी संधी प्राप्त झाली. ज्यामुळे महिला सशक्तीकरणाला चालना मिळाली.

प्रमुख वक्ते म्हणून मार्गदर्शन करताना सम्यक रामटेके म्हणाले की, शैक्षणिक क्षेत्रात महिला विद्यार्थिनी वर होणाऱ्या अन्यायाच्या बातम्या वाचून मन सुन्न होते. शिक्षित माणूस स्वार्थी असतो, हे जरी खरे असले तरी त्याची पातळी फारच खालावलेली आहे. जगाच्या पाठीवरील धर्मांध नेतृत्वाने महिला वरती फारच बंधणे लादली आहेत. जो धर्म महिलांना आपली ओळख सुद्धा निर्माण करू देत नसेल तर तो धर्म काय कामाचा आहे?



याप्रसंगी राहुल मेश्राम म्हणाले की, समाजातील उच्च शिक्षितांनी धम्माच्या प्रचार प्रसार करण्यासाठी आपले जीवन समर्पित केले पाहिजे. पांढरे शुभ्र वस्त्र परिधान करून विहारात न जाणारी माणसे केवळ मुखाने जय भीम म्हणत असतात. प्रा. शिवम गायकवाड म्हणाले की, बाबासाहेबांची बहुतांश विधाने ही शैक्षणिक उद्देशपूर्ती शी संबंधित आहेत. करिता आपण समाज परिवर्तनासाठी बांधील असायला हवे. ॲड. सुनील कुमार नागवंश म्हणाले की, आपणास मिळालेल्या ज्ञानाचा उपयोग समाजासाठी केला पाहिजे. मेणबत्ती जळताना स्वतःचा देह झिजवीत असते ज्यात तिचे अस्तित्व संपुष्टात येत असते तरीही इतरांना प्रकाश देत असते, हे असेच कार्य आदर्श महापुरुषाकडून सातत्याने घडत असते. डॉ. कल्पना गंगावणे म्हणाल्या की, आपण आपण सर्वांनी कार्यशाळेला परिवारासह उपस्थित राहिले पाहिजे. उद्योजक मिलिंद बागुल म्हणाले की, कायद्यात तरतूद असल्यावर सुद्धा त्याचे पालन न करता आपण नैतिकतेची वाट लावत असतो. डॉ. व्ही. एच. कांबळे म्हणाले की, उच्च शिक्षितांनी महिलांना समानतेची वागणूक देण्यासाठी कर्तव्य म्हणून जबाबदारी पार पडली पाहिजे.

सुरुवातीला आदर्शांना पुष्प व पुष्पमाला अर्पण करून स्टडी फाउंडेशनच्या वतीने मान्यवरांचे व उपस्थित प्रतिनिधींचे स्वागत करण्यात आले. सूत्रसंचालन ॲड. विलास रामटेके तर प्रास्ताविक प्रा. विलास कटारे यांनी तर मिलिंद बागुल यांनी आभार व्यक्त केले. याप्रसंगी ॲड. जी. एन. खंडागळे, उद्योजक शशिकांत काळे यांचीही उपस्थिती लाभली होती. अशाप्रकारे हर्षोल्हासात मोफत साप्ताहिक कार्यशाळा संपन्न झाली.

# कल्याण मुरबाड रोडवर कारचा अपघात

## जीवितहानी नाही; खड्ड्यात जावून पडली

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

मुरबाड/प्रतिनिधी : बाळासाहेब अहिरे : कल्याण मुरबाड रोडवरील सेंच्युरी स्कुलचे समोरून जात असताना वाहन चालक त्यांना रोडवरील स्पीड ब्रेकर न दिसल्याने स्पीड ब्रेकर खुप जवळ आल्यावर कारचा ब्रेक. मारल्याने ते चालवत असलेली कार क्रमांक मारूती अल्टो के १० कार नंबर एम. एच./०१/बी.बी./४९६९ स्पीड ब्रेकर वर आदळून कार स्पीड ब्रेकरचे पुढे जावून रोडवर पडलेल्या मातीवरून स्लीप होवुन रोडचे डावे बाजुस लावण्यात आलेल्या संरक्षण पत्र्याला धडकुन त्याचे डावे बाजुस असलेल्या खड्यामध्ये कार पडुन कारचे पुढील काच, डावे साईड मिरर, दोन्ही डावे दरवाजे, दरवाजांचे काच, डावे बाजुचे पुढील व मागील हेड लाईट, सिनल लाइंट, उजवे बाजुचे पुढील लाईट, वरील छत, पुढील चेसीस, कारचे टायर व सस्पेंशन यांचे तुटून, फुटून, खरचटुन संपुर्ण कारचे नुकसान झालेले आहे. सदरचा अपघात हा वाहतुकीचे ओघात, अनावधानाने झालेला असून सदर अपघातात कोणाची ही जिवीतहानी दुखापत झालेली नाही





# अॅड.पंचशिला ज्वाला हौसलमल यांचे जीवन कौशल्य विकास या विषयावर व्याख्यान संपन्न

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

कळंब: प्रतिनिधी, सुधाकर रणदिवे, दि ८ मार्च २०२६ रोजी पीएम श्री नगर परिषद प्राथमिक शाळा क्रं २ कळंब येथे पीएमश्री या उपक्रमांतर्गत विविध विषयांवर तज्ज्ञ व्यक्तीचीं व्याख्याने या उपक्रमांतर्गत आयोजित केलेल्या व्याख्याना मध्ये प्रथम उपस्थितांनी मुलींच्या शिक्षणा- ची मुहूर्तमेढ रोवणाऱ्या पहिल्या महिला शिक्षिका क्रांती ज्योती सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमेचे पूजन केले.



प्रतिमापूजनानंतर शाळेचे मुख्याध्यापक मुकुंद नांगरे यांनी कार्यक्रमाचे प्रास्ताविक करून जीवन कौशल्य विकासा मध्ये संवाद कौशल्य, निर्णय क्षमता, स्वविकास आणि नेतृत्व विकास यांचे महत्त्व विद्यार्थ्यांना सांगितले.कार्यक्रमाचे सुत्रसंचलन श्रीमती नागटिळक यांनी करतांना विद्यार्थ्यांना भारतीय संस्कृतीची आणि कर्तृत्ववान महिलांची माहिती सांगितली जीवन कौशल्य विकास या उपक्रमांतर्गत व्याख्यानाचे व्याख्याते मा. ड. पंचशिला ज्वाला हौसलमल यांनी विद्यार्थ्यांना आणि विद्यार्थिनींना संवाद कौशल्य, निर्णय क्षमता, स्वविकास आणि नेतृत्व विकास कशा पद्धतीने सुधारणा होईल यासाठी विविध उदाहरणे देऊन स्पष्टीकरण देऊन विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले.बालविवाहबद्दल आणि पोक्सो कायदा याबाबत विद्यार्थ्यांनीना आणि विद्यार्थ्यांना सखोल माहिती देण्यात आली. विद्यार्थीनींनी नेहमी समाजात निर्भिडपणे वावरले पाहिजे याबाबत त्यांनी सांगितले .याप्रसंगी इयत्ता पाचवी वर्गातील विद्यार्थ्यांनी कु. आरोही चव्हाण अंजली कोकाटे, योगिता सुर्यवंशी, अनुष्का कस्पटे, खतिजा शेख, अनन्या हौसलमल इयत्ता पहिलीची विद्यार्थीनी कु अर्पिता कुलकर्णी यांनी कर्तृत्ववान महिलांचा वेशभूषा करून त्यांच्या कार्याची माहिती विषद केली .

कार्यक्रमाचे आभार सोनाली पाटील यांनी मानले.कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी मुकुंद नांगरे, रमेश चव्हाण, प्रशांत सलगरे, विशाल वाघमारे, अमोल चव्हाण, विनोद राऊत,सयाराणी कऱ्हाड, सोनाली पाटील, गिताश्री नागटिळक, सेविका सोना- ली हौसलमल आणि विद्यार्थ्यांनी परिश्रम घेतले.

# मुलांच्या यशामागील प्रेरणादायी मातृशक्ती : योगिता शिंदे

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**



निफाड/प्रतिनिधी : उच्च शिक्षीत असतांनाही कोणतीही नोकरी , व्यवसाय न करता स्वतः चे अपूर्ण राहिलेले स्वप्न त्यांनी आपल्या मुलांच्या माध्यमातून पूर्ण केले अशा निफाड शहरा- तील जिल्हा परिषद उच्च प्राथमिक शाळा निफाड नं १ शाळेचे मुख्याध्यापक निलेश शिंदे यांच्या सौभाग्यवती सौ योगिता शिंदे यांना नुकताच महाराष्ट्र राज्य मराठा सेवा संघाचा जिजाऊरत्न पुरस्कार देऊन गौरविण्यात आले.

स्वतः उच्च शिक्षण घेऊन कोणतीही नोकरी किंवा व्यवसाय न करता स्वतः च्या मुलांना सामाजिक, शैक्षणिक क्षेत्रात सर्वोच्च शिखरावर पोहोचविण्यासाठी सतत कार्यरत असलेल्या सौ योगिता शिंदे यांचे शिक्षण एम ए बी एड असून त्यांनी स्वतः च्या मुलांच्या समोर राजमाता जिजाऊ, छत्रपती शिवराय यांचा आदर्श ठेवून उच्च शिक्षण घेण्यासाठी नेहमीच प्रेरीत केले.

सौ योगिता शिंदे यांचा मुलगा प्रणव बी टेक मॅकेनिकल इंजिनिअर असून भारत सरकारच्या संरक्षण मंत्रालयात डी आर डी ओ चेन्नई येथे डिझाइन इंजिनिअर म्हणून कार्यरत आहेत तर मुलगी कु लावंण्या भारतात सुप्रसिद्ध डॉ रेड्डी मेडिकल इन्स्टिट्यूट मध्ये एम बी बी एस चे शिक्षण घेत आहे सौ योगिता शिंदे यांचे पती निलेश शिंदे हे शिक्षक म्हणून कार्यरत असून सौ योगिता शिंदे ह्या पतीच्या सामाजिक , शैक्षणिक कार्यात सहभागी होऊन निफाड शहरातील विशेष करून एकल माता पालक व दिव्यांग विद्यार्थी यांच्या कल्याणासाठी प्रयत्नशील आहेत. नाशिक जिल्हा मराठा सेवा संघाच्या वतीने दरवर्षी महिला मेळाव्याचे आयोजन करून या मेळाव्यात महिलांसाठी रांगोळी , उखाणे , पाककृती यांसारख्या स्पर्धांचे आयोजन करून महिलांना स्वतःच्या कलागुणांना वाव मिळण्यासाठी सौ योगिता शिंदे व्यासपीठ उपलब्ध करून देतात सौ. योगिता शिंदे ह्या नाशिक जिल्हा मराठा सेवा संघ आणि जिजाऊ ब्रिगेडच्या सदस्या असून नाशिक जिल्ह्या- तील आधार आश्रमातील महिला व मुली यांसाठी विविध उपक्रम राबवून जीवनात चैतन्य निर्माण करण्याचे काम केले आहे

सारथी संस्थेच्या विविध शासकीय योजनांचा मराठा समाजातील विद्यार्थ्यांसाठी लाभ मिळवून देण्यासाठी सौ योगिता शिंदे नेहमी प्रयत्नशील असतात

सध्याची जीवनशैली आणि आरोग्याची काळजी व महीला आरोग्य तपासणी शिबिर आयोजनासाठी त्यांचा सक्रिय सहभाग असून त्यांच्या या सर्व कामाची दखल घेऊन सौ योगिता शिंदे यांना सन २०२५ चा महाराष्ट्र राज्य मराठा सेवा संघाचा राजमाता जिजाऊरत्न पुरस्कार प्रदान करून गौरविण्यात आले आहे.

# अनाथ मुलांच्या हस्ते लघुचित्रपट 'काळीमा ' पोस्टरचे अनावरण

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

प्रतिनिधी/बाळासाहेब अहिरे

जामखेड :- येथील निवारा बालगृह, मोहा फाटा, समता भूमी बीड रोड येथे अॅड. अरुण (आबा) जाधव नगरसेवक यांचा 'काळीमा' या शॉर्ट फिल्मच्या पोस्टरचे अनावरण अनाथ मुलांच्या हस्ते करण्यात आले.

'काळीमा' या शॉर्ट फिल्मची टॅगलाईन विशिष्ट जातीला लाग- लेला कलंक अशी आहे. भटके विमुक्त, आदिवासी जातीला लागलेला ठिपका, म्हणजेच कलंक याचे प्रतीक म्हणून या चित्रपटाला 'काळीमा' हे नाव देण्यात आले आहे.आणि हाच काळीमा नावाचा लघु चित्रपट येणाऱ्या ८ मार्च महिला जागतिक दिनानिमित्ताने निवारा बालगृह मोह फाटा समता भूमी येते हजारोच्या संख्येने प्रदर्शित होणार आहे..

यावेळी बोलताना अरुण (आबा ) जाधव यांनी भटके-विमुक्त आदिवासी समाजाच्या प्रश्नांवर प्रकाश टाकला आहे. भटके- विमुक्त समाजावर, आदिवासी यांच्यावर होत असलेल्या अन्याय, अत्याचार आणि जाळपोळ, जी- वघेणे हाल्ले,सामाजिक कलंकाच्या पार्श्वभूमीवर ही शॉर्ट फिल्म तयार करण्यात आल्याचे त्यांनी सांगितले आहे.अरुण (आबा) जाधव स्वतः भटके-विमुक्त समाजातून आलेले असल्यामुळे या समाजाच्या वेदना आणि संघर्षाची त्यांना जवळून जाणीव असल्याचे त्यांनी नमूद केले.




या कार्यक्रमाचे सुत्रसंचलन संतोष चव्हाण सर यांनी केले .या शॉर्ट फिल्मची कथा, पटकथा आणि दिग्दर्शक :- सचिन चव्हाण यांनी केले असून निर्माते :- उमाताई जाधव यांनी जबाबदारी सांभाळली आहे.या कार्यक्रमास सचिन भिंगारदिवे, रेश्मा बागवान, बापू ओव्होळ, ऋषिकेश गायकवाड, संगीता केसकर, जाकीर मामा, गौतमी गंगावने, छाया मोरे, भक्ती पवार, संदीप आखाडे व बालगृहातील मुले, स्थानिक नागरिक व कार्यकर्ते उपस्थित होते व कार्यक्रमाचे आभार प्रदर्शन वैजीनाथ केसकर सर यांनी केले.

# निफाड नगरपंचायत कार्यालयात जागतिक महिला दिन साजरा

## सफाई महीला कर्मचारी यांचा सनकोट देऊन सन्मान

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

निफाड/प्रतिनिधी :सालाबादप्रमाणे यावर्षी ही निफाड नगरपंचायत कार्यालय येथे जागतिक महिला दिन नगरपंचायत च्या महिला सफाई कर्मचारी यांच्यासोबत साजरा करण्यात आला. दि. ०८ मार्च ते दि. १४ मार्च २०२६ दरम्यान निफाड नगरपंचायत येथे विविध उपक्रम राबविण्यात येणार आहे. जसे की डिजिटल स्पॉटलाईट स्टोरीज(७ दिवस, ७ महिला स्वच्छता पुढारी), सफाई मित्र सुरक्षा शिबिर, स्वच्छता आणि कचरा व्यवस्थापनातील स्वयंसहायता गटांची क्षमता बांधणी या अंतर्गत हा आठवडा जागतिक महिला दिन म्हणून साजरा करण्यात येणार आहे. मुख्याधिकारी . धिरज भामरे यांच्या आदेशान्वये आज दिनांक ८ मार्च २०२६ रोजी निफाड नगरपंचायत कार्यालय येथे महिला स्वच्छता कर्मचाऱ्यांच्या कामाचे कौतुक व त्यांच्या विषयी आदर म्हणून महिला दिन साजरा करण्यात आला. त्या अंतर्गत सर्व महिला सफाई कामगार यांना महिला दिनाचे विशेष नमूद करून व त्यांच्या कामाच्या ठिकाणी काम करीत असताना व त्यांचे उन्हापासून संरक्षण व्हावे या हेतूने सनकोटचे वाटप करण्यात आले. सोबत त्यांचा सत्कार समारंभ आयोजित करून जागतिक महिला दिन उत्साहात साजरा करण्यात आला.




यावेळी च्या नगरपंचायत च्या नगराध्यक्षा सौ. कांताबाई अशोक कर्डिले, नगरसेविका सौ. शारदा नंदकुमार कापसे, अधिकारी निलेश ठाकूर,शरद बोडके, मयुरी नवले कर्मचारी दिनेश सोनवणे,रतन खालकर ,शरद काकुळते,उज्वला दिघे, दिपाली गिते,लता शिंदे,योगेश कांदळकर,मनोज कुभार्डे, सुनील गांगुर्डे, सिद्धार्थ जगताप,तुषार इंगळे आदी उपस्थित होते.

## एमआयटी विश्वप्रयाग विद्यापीठात स्वामी विवेकानंदांच्या भव्य पुतळ्याचे अनावरण



# स्वामी विवेकानंदांनी जगाला भारतीय संस्कृतीची ओळख करून दिली : स्वामी गोविंददेव गिरी महाराज यांचे विचार

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

सोलापूर : '१८९३ साली स्वामी विवेकानंदांनी शिकागो येथे झालेल्या आंतरराष्ट्रीय धर्मपरिषदेत केलेल्या ऐतिहासिक भाषणामुळे संपूर्ण जगा- चा भारताकडे पाहण्याचा दृष्टीकोन बदलला. भारत हा ज्ञानाचे भांडार असलेला आणि वैभवसंपन्न देश आहे, याची जाणीव जगाला झाली. याच घटनेतून भारताच्या पुनरुत्थाना- ची मुहूर्तमेढ रोवली गेली,' असे मत श्रीराम जन्मभूमी तीर्थक्षेत्र अयोध्या ट्रस्टचे कोषाध्यक्ष स्वामी गोविंददेव गिरी महाराज यांनी व्यक्त केले. एमआयटी विश्वप्रयाग विद्यापीठांमध्ये स्वामी विवेकानंदांच्या पुतळ्याच्या अनावरण प्रसंगी ते बोलत होते. या सोहळ्याला श्री विठ्ठल-रुक्मिणी मंदिर समिती पंढरपूरचे सह-अध्यक्ष सद्गुरू गहिनीनाथ महाराज औसेकर प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी माईर्स एमआयटीचे संस्थापक अध्यक्ष प्रा. डॉ. विश्वनाथ दा. कराड होते. कार्यक्रमाची सुरुवात सरस्वती पूजन आणि दीपप्रज्वलनाने करण्यात आली. याप्रसंगी माईर्स एमआयटी संस्थेच्या विश्वस्त व महासचिव आणि एमआयटी विश्वप्रयाग विद्यापीठाच्या कार्यकारी अध्यक्षा प्रा. स्वाती कराड चाटे, विद्यापीठाचे संस्थापक कुलगुरू प्रा. गोपाळकृष्ण जोशी, कुलसचिव प्राणेश मुरनाळ, सौ. उषा विश्वनाथ कराड, संचालक स्ट्रॅटजी अँड ऑपरेशन्स राघवेंद्र एम. चाटे, सिद्धेश्वर देवस्थानच पंचकमिटीचे अध्यक्ष धर्मराज काडादी, प्रसिद्ध पंचांगकर्ते मोहन दाते, सिद्धेश्वर सहकारी साखर कारखान्याचे अध्यक्ष पुष्पराज काडादी, सोलापूर महानगरपालिकेचे उपायुक्त आशिष लोकरे, चार्टर्ड अकाऊंटंट राज मिणियार, सोलापूर आर्किटेक्चर असोसिएशनचे असिम सिंदकी, कायझन होंडाचे संचालक सुरेन्द्र शिरकोळे आणि सोलापुरातील मान्यवर उपस्थित होते.

पुढे बोलताना स्वामी गोविंददेव गिरी महाराज म्हणाले, देशाच्या माननीय पंतप्रधानांनी आपल्या भाषणात पुढील दहा वर्षात आपण आपल्या देशाच्या गुलामगिरीच्या सर्व खुणा पुसून टाकण्याचा संकल्प करण्याचे आहावन केले. परंतु स्वातंत्र्यानंतर तसे कार्य करण्याची प्रेरणा कोणी दिली असेल तर ती स्वामी विवेकानंदांनी दिली आणि त्या गुलामगिरीच्या खुणा पुसण्याचे काम ज्या प्रकारे एमआयटीमध्ये प्रा. डॉ. विश्वनाथ कराड यांच्याकडून होत आहे ते पाहून स्तिमित व्हायला होत. असे विचार त्यांनी यावेळी व्यक्त केले.

श्री विठ्ठल-रुक्मिणी मंदिर समितीचे सह-अध्यक्ष गहिनीनाथ महाराज औसेकर म्हणाले, सत्ता, संपत्ती आणि कीर्ती पंचवण्यासाठी अध्यात्माचे बळ लागते आणि ते प्रा. डॉ. विश्वनाथ कराड यांच्याकडे असल्यामुळे त्यांनी संत ज्ञानेश्वर व संत तुकाराम महाराजांच्या वारकरी तत्वज्ञाना- चा अंगीकार करत मूल्य शिक्षणाचा वारसा उभा केला.

आपल्या अध्यक्षीय भाषणात एमआयटी समुहाचे संस्थापक अध्यक्ष विश्वधर्मी प्रा. डॉ. विश्वनाथ दा. कराड म्हणाले की, ग्रामदैवत सिध्द- रामेश्वराच्या भूमीत स्वामी विवेकानंद यांचा पुतळा उभारणी हा एक योग अभुतपूर्व आहे. सध्याच्या परिस्थितीत जगाला संताच्या विश्वात्मके देवाच्या प्रार्थनेची गरज आहे. युनेस्कोमध्ये संत ज्ञानेश्वरांची विश्वकल्याणाचे पसायदान प्रार्थना पोहोचवता आल्याचे समाधान असल्याचे त्यांनी यावेळी सांगितले.

याप्रसंगी बोलताना एमआयटी विश्वप्रयाग विद्यापीठाच्या कार्यकारी अध्यक्षा प्रा. स्वाती कराड चाटे यांनी वर्गामध्ये विषयाचे ज्ञान घेणे जसे आवश्यक आहे तसेच वर्गाच्या बाहेरही विद्यार्थ्यांना देशात होऊन गेलेल्या थोर महापुरुषांची महती समजावी आणि त्यातून त्यांना प्रेरणा मिळावी आणि त्यांचे व्यक्तिमत्व घडावे हे या संस्थेचे नेहमीच ध्येय राहिले आहे. विद्यापीठामध्ये उभारण्यात आलेला हा स्वामी विवेकानंदांचा पुतळा विद्यार्थ्यांसाठी प्रेरणा देणारा ठरेल. असे मनोगत व्यक्त केले. कार्यक्रमाच्या सुरुवातीला पंडित भिमण्णा जाधव यांचे सुंद्री वादन झाले. एमआयटी विश्वप्रयाग विद्यापीठाचे कुलगुरु डॉ. गोपाळकृष्ण जोशी यांनी प्रास्ताविक केले तर कुलसचिव प्राणेश मुरनाळ यांनी आभार प्रदर्शन केले. या कार्यक्रमास संस्थेचे विश्वस्त व पदाधिकारी, विद्यापीठाचे अधिष्ठाता, प्राध्यापक, विद्यार्थी, पालक आणि नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.